# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** करवीर **Year (वर्ष):** 2020

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 1391 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 26/07/2020 23:58 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day**(दिवस): दरमियानी दिन — **Date From** (दिनांक पासून): 25/07/2020
**Time Period** (कालावधी): — **Date To** ( दिनांक पर्यंत): 26/07/2020
**Time From** (वेळेपासून): 12:01 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 13:19 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 26/07/2020 **Time** (वेळ): 23:45 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 025 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 26/07/2020 23:45 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): दक्षिण, 12 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): भोगावती साखर कारखान्याचे विश्र,कुरूकली गावाचे चैकात कोल्ड्रीं

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): शिवभद्र भिकाजी सुतार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1992 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आवळी खूर्द, ता राधानगरी,राधानगरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आवळी खूर्द, ता राधानगरी,राधानगरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दादाहरी अभिमन्यु बांगर | | | 1. पोलीस मुख्यालय, कसबा बावडा रोड, शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | प्रविण लहु पाटील | | | 1. भेंडे गल्ली, कुरुकली, ता करवी,करवीर, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 3,000/ त्यात 500/ रु दराच्या सहा चलनी नोटा | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 3,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 26/07/2020मी शिवभद्र भिकाजी सुतार, वय-28, व्यवसाय - नोकरी, रा. आवळी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर, मो.नं.- 7875753802, समक्ष पोलीस ठाणेत हजर राहुन लिहुन देतो फिर्याद अशी की, मी वरील पत्यावर माझे आई वडीलांचेसह रहाणेस असुन मी सीपीआर हास्पीटल कोल्हापूर येथे वार्डबाय म्हणुन नोकरी करतो. गणेश कांबळे रा. दारवाड ता. भुदरगड हा माझा मित्र आहे. आगस्ट 2019 मध्ये त्याने मला नोकरी लावतो असे सांगुन नोकरी लावणेसाठी माझेकडुन 2,51,000/- रुपये घेतले होते. त्यानंतर नोव्हेंबर 2019 मध्ये गणेश कांबळे याने माझे नावावर पल्सर मोटर सायकल विकत घेतली असुन मोटर सायकल घेणेसाठी मी बजाज फायनान्स कंपनीचे कर्ज घेतले होते. ती मोटर सायकल गणेश कांबळे हाच वापरत होता. सुरुवातीचे 4/5 महिने गणेष कांबळे याने कर्जाचे हप्ते भरले. पण त्यानंतर त्याने कर्जाचे हप्ते भरले नाहीत. त्यामुळे बजाज फायनान्स कंपनीने कर्जाचे हफ्ते भरणेसाठी माझेकडे तगादा लावला होता. गणेश कांबळे याने माझे नावावर मोटर सायकल घेतली परंतु तो आता कर्ज फेडत नाही. तसेच त्याने माझेकडुन पैसे घेवुन मला नोकरी लावली नाही. त्यामुळे तो माझी फसवणुक करत असलेचे माझे लक्षात आलेने मी दिं. 03/06/2020 रोजी महाराश्ट्र षासनाचे आपले सरकार या पोर्टलवर तक्रारी अर्ज केला होता. मी केलेला तक्रारी अर्ज चैकषीसाठी करवीर पोलीस ठाणेस आला होता. त्या अर्जाची चैकषी करवीर पोलीस ठाणेचे पे◌ालीस दादा बांगर हे करीत होते. पोलीस दादा बांगर यांनी माझे तक्रारी अर्जाची चैकशी करुन दिनांक 21/07/2020 रोजी भोगावती येथे मला मोटर सायकल परत मिळवुन दिली. त्यावेळी त्यांचे सोबत होमगार्ड प्रविण पाटील रा. कुरुकली हा होता. माझी मोटर सायकल परत मिळवुन दिली म्हणुन पोलीस दादा बांगर यांनी माझेकडे 2000 ते 3000/- रुपये मागणी करुन तेवढे पैसे होमगार्ड प्रविण पाटील याचेकडे देणेस सांगितले. त्यावेळी होमगार्ड प्रविण पाटील यानेही बांगर साहेबांचे मुळे तुला मोटर सायकल परत मिळाली आहे. त्यांनी सांगितलेले पैसे माझेकडे दे असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना आता माझेकडे पैसे नाहीत. तेव्हा त्यांनी मला दि. 25/07/2020 रोजी सकाळी 11.00 वाजणेचे दरम्यान भोगावती गावी पैसे घेवुन ये असे सांगितले. त्यामुळे मी दि. 24/07/2020 रोजी पोलीस दादा बांगर व होमगार्ड प्रविण पाटील यांचे लाच मागणीबाबत त्यांचेविरुध्द अन्टी करश्पन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रारी अर्ज दिला होता. त्यावेळी पोलीस निरीक्षक युवराज सरनोबत साहेबांनी मला माझे तक्रारीबाबत गोपनीयता राखणेस सांगुन दि. 25/07/2020 रोजी कोल्हापूर ते भोगावती रोडवरील कोथळी गावचे अलीकडे काही अंतरावर भेटण्याचे ठरवुन मला घरी पाठविले होते. दि. 24/07/2020 रोजी ठरल्याप्रमाणे दि. 25/07/2020 रोजी पोनि सरनोबत साहेब, दोन शासकीय पंच व स्टाफ असे मला

त्यांचे कार्यालयाकडील टाटा सुमो व एका मोटर सायकलने येवुन कोल्हापूर ते भोगावती रोडवरील कोथळी गावाजवळ मला येवुन भेटले होते. त्यानंतर त्यांनी माझी, पंचांची व त्यांचे कार्यालयाकडील स्टाफची आपसात ओळख करून देवुन मला पंचांना माझी तक्रार तोंडी सांगणेस सांगितली. मी माझी तक्रार सांगुन झालेवर पोनि सरनोबत यांनी मी दिलेला तक्रारी अर्ज पंचांना वाचणेस दिला. त्यानंतर पोनि सरनोबत व दोन्ही पंचांनी माझे तक्रारी अर्जावर सह्या करून पोनि सरनोबत यांनी मला व दोन्ही पंचांना पोलीस दादा बांगर व होमगार्ड प्रविण पाटील हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. तसेच पडताळणीकरीता मी पोलीस दादा बांगर व होमगार्ड प्रविण पाटील यांचेकडे जाताना माझेसोबत पंच श्री. जाधव यांना माझेसोबत माझे मोटर सायकलवरून पाठवणार असल्याचे सांगितले. पडताळणी कारवाईचे अनुषंगाने पोनि सरनोबत यांनी मला व पंचांना योग्य सुचना दिल्या व मला पोलीस बांगर व होमगार्ड पाटील हे कोठे भेटतील असे विचारले? त्यावेळी मी त्यांना पोलीस बांगर व होमगार्ड पाटील हे भोगावती कारखान्याच्या गेस्ट हाऊसमध्ये थांबले असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि सरनोबत यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकर्डर काढून रेकर्डरमध्ये नविन मायक्रो एसडी कार्ड घालून तो गळयात अडकवुन 12.01 वा चालु करून मला व पंच श्री. जाधव यांना माझे मोटर सायकलवरून भोगावती साखर कारखान्यातील गेस्ट हाऊसमध्ये पोलीस दादा बांगर व होमगार्ड प्रविण पाटील यांची भेट घेणेसाठी पाठविले. भोगावती साखर कारखान्यातील गेस्ट हाऊस येथे मी, पंच जाधव यांचेसोबत माझे मोटर सायकलवरून जावुन पोलीस दादा बांगर व होमगार्ड प्रविण पाटील यांची भेट घेतली. त्यावेळी तेथे पोलीस दादा बांगर, होमगार्ड प्रविण पाटील व इतर दोन अनोळखी इसम हजर होते. मी पोलीस बांगर यांचेची माझे कामासंदर्भात विषय काढला, तेव्हा त्यांनी मला होमगार्ड पाटील यांचेकडे हाताने इशारा करून त्याला ते बघ रे असे म्हणुन जायला सांगितले. त्यावेळी होमगार्ड प्रविण पाटील यांचेशी माझे कामाबाबत चर्चा होवुन त्याने माझेकडे मला माझी गाडी सोडवुन दिली म्हणुन पोलीस बांगर यांचेसाठी म्हणुन 3,000/- रू. लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच जाधव असे माझे मोटर सायकलवरून पोनि सरनोबत साहेब व त्यांचा स्टाफ थांबलेठिकाणी परत आलो. आम्ही परत आलेवर पोनि सरनोबत यांनी मला गाडीमध्ये बोलवुन माझे गळयातील डिजीटल व्हईस रेकर्डर 12.49 वा बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर पोनि सरनोबत यांनी मला गाडीतुन बाहेर थांबणेस सांगुन पंच जाधव यांचेकडे चैकशी केली. त्यानंतर मला थोडयावेळाने परत आत बोलवुन घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, मी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि सरनोबत साहेबांनी डिजीटल व्हईस रेकर्डरमधील माझे आणि होमगार्ड प्रविण पाटील यांचेतील लाच मागणी संदर्भातील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले. सदर ऐकले संभाशणावरुन व पंच जाधव आणि माझे सांगणेवरुन माझे तक्रारी अर्जावरुन माझा मित्र गणेश कांबळे यांचेकडुन मला मोटर सायकल परत मिळवुन दिलेबदत होमगार्ड पाटील याने पोलीस बांगर यांचेसाठी 3,000/- रू. लाचेची मागणी केलेची त्यांची खात्री झाली. पण त्यावेळी माझी व पोलीस बांगर यांचेशी माझे कामाबाबत चर्चा झाली पण लाच मागणी संदर्भात कोणतीही चर्चा झाली नसल्याने त्यांचे लाच मागणीची खात्री होणेसाठी पोनि सरनोबत साहेबांनी मला व पंच जाधव यांना परत पोलीस दादा बांगर व होमगार्ड प्रविण पाटील यांची भेट घेण्यासाठी भोगावती साखर कारखान्यातील गेस्ट हाऊस येथे पाठविण्याचे ठरविले. त्यानंतर त्यांनी ते माझे पाठोपाठ कारखान्याच्या गाडी अड्डयावर येवुन थांबणार असल्याचे सांगुन मलाही भेट झालेवर त्याठिकाणी गाडी अड्डयावर परत येण्यास सांगितले. पोनि सरनोबत यांनी मला व पंचांना योग्य सुचना देवुन, त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकर्डर माझे गळयात अडकवुन 13.29 वा चालु करून मला व पंच श्री. जाधव यांना माझे मोटर सायकलवरून भोगावती साखर कारखान्यातील गेस्ट हाऊसमध्ये पोलीस दादा बांगर यांची भेट घेण्यासाठी पाठविले. त्यावेळी मी व पंच जाधव असे कारखान्याकडे चाललो असताना कारखान्याचे अलीकडे पेट्रोल पंपासमोर माझे मोटर सायकलबाबत गाडी शोरूमचे मालक श्री. धुळाप्पा रानगे व इतर दोघांनी आम्हाला अडवुन माझी मोटर सायकल काढुन घेतली. माझा मित्र गणेश कांबळे याने गाडी खरेदी करतेवेळी गाडीबाबत रानगे यांनी केलेला खर्च त्यांना अद्याप दिला नसल्याने त्यांनी गाडी काढुन घेतली. त्यावेळी आमच्या किरकोळ वाद व शिवीगाळी पण झाली. पण त्यावेळी पोलीस बांगर यांची भेट घेणे महत्वाचे असल्याने मी व पंच जाधव असे तेथुन चालत गेस्ट हाऊसकडे गेलो. तेथे पोलीस दादा बांगर व होमगार्ड प्रविण पाटील हे झोपले होते. तेव्हा मी होमगार्ड पाटील ला उठवुन त्याला पोलीस बांगर यांची भेट घ्यायची असलेबाबत सांगितले. त्यावेळी त्याने मला ते आता झोपले आहेत, तु 05.00 वाजेपर्यंत ये असे सांगितलेने मी व पंच जाधव असे तेथुन चालत पोनि सरनोबत साहेब व त्यांचा स्टाफ असे थांबलेठिकाणी परत आलो. आम्ही परत आलेवर पोनि सरनोबत यांनी मला गाडीमध्ये बोलवुन माझे गळयातील डिजीटल व्हईस रेकर्डर 14.03 वा बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर पोनि सरनोबत यांनी मला गाडीतुन बाहेर थांबणेस सांगुन पंच जाधव यांचेकडे चैकशी केली. त्यानंतर मला थोडयावेळाने परत आत बोलवुन घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, मी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि पाटील यांनी साहेबांनी डिजीटल व्हईस रेकर्डरमधील माझे आणि होमगार्ड प्रविण पाटील यांचेतील लाच मागणी संदर्भातील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले. सदर ऐकले संभाशणावरुन व पंच जाधव आणि माझे सांगणेवरुन पोलीस दादा बांगर हे झोपले असल्याने होमगार्ड पाटील याने सायकाळी 05.00 वाजेपर्यंत भेटायला येण्यास सांगितलेचे त्यांना निष्पन्न झाले. त्यामुळे परत मला व पंच जाधव यांना संध्याकाळी 05.00 वाजता पोलीस दादा बांगर यांची भेट घेण्यासाठी पाठविण्याचे ठरवुन टाटा सुमोमध्ये बसुन आम्ही सर्वजण कोथळी येथे सकाळी थांबलेल्या ठिकाणी जावुन थांबलो होतो. तेथे थांबुन राहिलो त्यावेळी होमगार्ड पाटील याचा मला माझे मोबाईलवर मिसकल आला. त्याबाबत मी पोनि सरनोबत साहेबांना सांगितले, तेव्हा त्यांनी मला त्यास फोन लावण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी फोन लावला आणि माझी गाडी रानगेने काढुन घेतली आहे असे सांगतानाच होमगार्ड पाटील याने रानगे येथे आलेचे सांगुन मला तिकडे भेटायला बोलविले.तेव्हा पोनि सरनोबत यांनी मला व पंचांना योग्य सुचना देवुन, त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकर्डर काढून रेकर्डर माझे गळयात अडकवुन 15.57 वा चालु करून मला व पंच श्री. जाधव यांना त्यांचेकडील स्टाफचे मोटर सायकलवरून भोगावती साखर कारखान्यातील गेस्ट हाऊसमध्ये पोलीस दादा बांगर यांची भेट घेण्यासाठी पाठविले. तेथे गेल्यावर पोलीस बांगर व होमगार्ड पाटील यांचे समक्षच रानगे यांचेसोबत यांनी गाडी काढुन घेतलेबाबत व पैसे देणे असलेबाबत चर्चा झाली व रानगे तेथुन निघुन गेले. त्यानंतर पोलीस बांगर यांचेशी माझे कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी मी त्यांना तुम्ही पोलीस पाटील यांना गाडी परत मिळवुन दिलेबाबत 2,000/- रू. देण्यास सांगितले होते. तेव्हा पोलीस बांगर यांनी मला दोन हजार नाही, तीन हजार सांगितले होते असे म्हणुन माझेकडे 3,000/- रू. लाचेची मागणी करून ती लाच रक्कम दि. 26/07/2020 रोजी होमगार्ड प्रविण पाटील यांचेकडे देण्यास सांगितली. तेव्हा होमगार्ड पाटील यानेही परत लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच जाधव असे मोटर सायकलवरून पोनि सरनोबत साहेब व त्यांचा स्टाफ थांबलेठिकाणी परत आलो. आम्ही परत आलेवर पोनि सरनोबत यांनी मला गाडीमध्ये बोलवुन माझे गळयातील डिजीटल व्हईस रेकर्डर 17.45 वा बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर पोनि सरनोबत यांनी मला गाडीतुन बाहेर थांबणेस सांगुन पंच जाधव यांचेकडे चैकशी केली. त्यानंतर मला थोडयावेळाने परत आत बोलवुन घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, मी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि पाटील यांनी साहेबांनी डिजीटल व्हईस रेकर्डरमधील माझे आणि होमगार्ड प्रविण पाटील यांचेतील लाच मागणी संदर्भातील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले. सदर ऐकले संभाषणावरुन व पंच जाधव आणि माझे सांगणेवरुन पोलीस बांगर व होमगार्ड पाटील यांनी मला माझी गाडी परत मिळवुन देलेबदल माझेकडे 3,000/- रू. लाचेची मागणी करून ती लाच दि. 26/07/2020 रोजी होमगार्ड पाटील याचेकडे देण्यास सांगितलेची पोनि सरनोबत साहेबांची खात्री झाली. तेव्हा सरनोबत साहेबांनी मला उदईक रोजी 11.00 वा चे सुमारास गाडी अड्डयावर भेटण्यास सांगुन मला घरी जाणेस सांगितले.त्याप्रमाणे आजरोजी पोनि सरनोबत, पंच व स्टाफ असे मला भोगावती कारखान्याचे गाडी अड्डयावर येवुन भेटले. त्यानंतर पोलीस बांगर व होमगार्ड पाटील हे कारखान्याचे रेस्ट हाऊसवर

आले आहेत की नाही हे मला माहित नसल्याने सरनोबत साहेबांनी होमगार्ड पाटील याचेशी संपर्क करायला सांगितले. त्याप्रमाणे मी त्याला फोन लावला तेव्हा त्याने कोल्हापूर येथे असल्याचे सांगुन मला अजुन यायला एक तास लागेल तुला आलेवर फोन करतो असे (मुळ फिर्याद सोबत जोडली आहे.)

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): sunil dattatray patil(I (Inspector)) / 100 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Shiv

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

ठाणे अंमलदार
करवीर पोलीस ठाणे

**Name** (नाव): sunil dattatray patil
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 100